# Level 1 -- Reading passages -- Exam 2015

साधना आईबरोबर दु कानात गे ली होती. दु कानातू न बाहे र गाडीपाशी जाताना एकदम जोराचा पाऊस सु रु झाला. पाऊस धो धो पडत होता. सगळी जमीन ओली झाली होती. आईने साधनाचा हात धरला. पळत पळत पटकन साधना गाडीत बसली. आई गाडीत बसली. साधनाला पावसात भिजायला
मजा आली.

प्रश्न

१) साधना कु ठे गे ली होती?

२) पाऊस कसा पडत होता?

३) आईने काय के ले ?

४) जमीन कशी झाली होती?

५) साधनाला कशामु ळे मजा आली?

# Level 1 -- Reading passages -- Exam 2015

आईने चिंगीला कपाट आवरायला सांगितले होते. तिने कपाट उघडले. अरे बापरे! कपाट नुसत भरलेले होते. खेळणी, शाळेचे सामान, कपडे, माळा, मोजे, रिबिनी एक ना अनेक. चिंगी कपटासमोर बसली. कुठून सुरवात करावी? मग आजोबांनी सांगितले आधी सगळे सामान कपाटातून बाहेर काढायचे. मग कपडे, शाळेचे सामान आणि इतर सामान असे ढीग करायचे. असे च हवे आणि नको असे दोन ढीग करायचे. हवा असलेला ढीग कपाटात ठेवायचा आणि नको असलेला ढीग बाजूला ठेवायचा

प्रश्न

१) चिंगी काय करत होती ?

२) तिच्या कपाटात कोणत्या गोष्टी होत्या ?

३) आजोबांनी काय सांगितले?

४) सामानाचे काय केले?

५) ढीग म्हणजे काय?